# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २६५ - २३** **दिनांक : - १७/०८/२०२३**

## जबरीचोरी व घरफोडी करणा-या सराईत गुन्हेगारांना अटक करुन ७ गुन्हयांची उकल, विरार पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी.

दि. ०६.०८.२०२३ रोजी सकाळी ०७.१० वा. चे सुमारास फिर्यादी श्रीमती विद्या मुंकुंद गुरव, वय ५५ वर्षे, ह्या कामावर जात असतांना युनीकॉर्न मोटार सायकलवरील एका अनोळखी इसमाने तक्रारदार यांच्या गाळयतील सोन्याची चैन जबरीने खेचुन घेऊन पळुन गेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं ७६८/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाची माहिती पोलीस ठाण्यात प्राप्त होताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळी धाव घेवुन तक्रारदार यांनी वर्णन केलेल्या इसमाचा गुप्त बातमीदारमार्फतीने शोध घेवुन करुन आरोपी शंकर हाल्या दिवा, वय ३६ वर्षे, रा. कातकरीपाडा, विरार पुर्व यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांने सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले तसेच त्योने विरार पालिस ठाणे अभिलेखावरील एकुण ५ गुन्हे केल्याचे तपासात उघड झाले आहे.

सदर आरोपीत याचेकडे अधिक तपास केला असता इतर आरोपीत नामे आरोपी जॅक ऊर्फ कुंदन सुरेंद्र नाक, वय २३ वर्षे व गोविंदा अनीलकुमार गौंड, वय २१ वर्षे, यांनी चोरी व घरफोडीचे गुन्हे केल्याचे माहीती प्राप्त झाल्याने वर नमुद आरोपीतांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी विरार व गणेशपुरी पो.ठाणे(जि.ठाणे ग्रामीण) च्या अभिलेखावरील २ गुन्हे तपसात निष्पन्न झाले आहे. अटक आरोपीत यांच्याकडुन घरफोडीचे एकुण ७ गुन्हे उघड होऊन एकुण २,३०,०००/- रु. किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

**- उघडकी आलेले गुन्हे -**

| | |
|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ७६८/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९२ प्रमाणे |
| २ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ७२५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९, ३४ प्रमाणे |
| ३ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ६९६/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४,४५७,३४ प्रमाणे |
| ४ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ७०८/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४ प्रमाणे |
| ५ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १६६/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ प्रमाणे |
| ६ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ७७१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| ७ | गणेशपुरी पो.ठाणे(जि.ठाणे ग्रामीण)गुन्हा.रजि.नं.८५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे |

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-३,श्री. सुहास बावचे तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग श्री. रामचंद्र देखमुख यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, श्री. दिलीप राख (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटी करण शाखेचे अधिकारी स.पो.नि.ज्ञानेश फडतरे, पो.हवा.सचिन लोखंडे, संदिप जाधव, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, विशाल लोहार, योगेश नागरे, पो.अं. मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव व फुल सोनार यांनी केलेली आहे.

********